# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

# परिपत्रक क्र. २२/२०२२

**विषय : अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ आणि माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम.आय.एस. २०२१-२२) ची माहिती...**

**संदर्भ : अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे पत्र क्र. अंगुसिक/४०२, दि. १९ जानेवारी, २०२२**

सोबत अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे उपरोक्त संदर्भांकित पत्र अवलोकनार्थ जोडले आहे. सदर पत्रान्वये ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम. आय. एस. २०२१-२२) मधील माहिती पूर्णपणे भरलेली नाही, अशा सर्व संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांनी तातडीने संबंधित वेबपोर्टलवर माहिती अपलोड करणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/ परिसंस्था यांना कळविण्यात येते की, सदर पत्रातील आशय विचारात घेऊन आपल्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०-२१ व माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम. आय. एस. २०२१-२२) मधील माहिती पूर्णपणे भरणे आवश्यक आहे. सदर भरलेल्या माहितीसंदर्भातील अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून आरक्षण कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या कार्यालयास बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करतेवेळी बिंदूनामावली प्रस्तावासोबत महाविद्यालय/परिसंस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**गणेशखिंड, पुणे-४११००७ )**
**जा. क्र. :आरक्षण/ओ-२२/ ९१ )**
**दिनांक: २४/०१/२०२२ )**

**डॉ. प्रफुल्ल अ. पवार**
**कुलसचिव**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-

१. मा.प्राचार्य/मा.संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था.
   - सदरहू परिपत्रक संबंधितांच्या निर्दशनास आणावे, ही विनंती.
२. सहायक कुलसचिव, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७
३. कार्यालयीन संचिका (ओ-२२)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१०४५
०२०—२५६२१०४८
०२०—२५६२१०४९

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:— अंगुसिक/४०२ दिनांक — १९/०१/२०२२

**अत्यंत तातडीचे**

आरक्षण कक्ष
सा. फु. पु. वि. पुणे
आवक क्र. 86.
दि. 20/01/2022.

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संबंधित सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था
आणि स्वायत्त महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय — **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०—२१ आणि माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम आय एस २०२१—२२) ची माहिती.**

संदर्भ — १. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र.
उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१—२२/१३७८९, दि. २६ नोव्हेंबर, २०२१
२. संदर्भ — **मा. संचालनालयाचे** पत्र संदर्भ क्रमांक. उशिसं/सांख्यिकी/एमआयएस/ २०२१—२२/१३७९०, दि.२६ नोव्हेंबर २०२१.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय विषयानुसार संबंधित महाविद्यालये व परिसंस्थांना कळविण्यात येते की, सन २०२०—२१ मध्ये ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) मध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२०—२१ **आणि माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम आय एस २०२१—२२)** मधील माहिती पूर्णपणे भरलेली नाही, अशा सर्व संबंधित महााविद्यालये वे परिसंस्थांनी **तातडीने** संबंधित वेबपोर्टलवर माहिती अपलोड करणे बंधनकारक आहे. अन्यथा भविष्यात उद्‌भवणा—या नुकसानीस संबंधित महाविद्यालयाचे /परिसंस्थेचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिकारी जबाबदार राहतील याची संबंधित महाविद्यालयाने व परिसंस्थेने गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **तातडीने** पूर्ण माहिती भरणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी उच्च शिक्षण संचालनालय, पुणे येथील दूरध्वनी क्रमांक ०२०—२९७०७०९३ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, ०२०—२५६२१०४५,४८,४९ यांच्याशी संपर्क साधावा.

Urgently,
Smt. Gandhile Madam,
pl. Issue Circular regarding information of MIS to All Affiliated colleges and Institutes.
22/01/2022

**सर्व कार्यालयीन कामकाज (शैक्षणिक/परिक्षा/आर्थिक इ.) M.I.S. & A.I.S.H.E. डेटा पूर्ण भरल्याशिवाय मंजूरी देण्यात येणार नाही याची संबधीतांनी कृपया नोंद घ्यावी.**

आपला,

(श्रीकांत गायकवाड)
सहायक कुलसचिव,

प्रत मा. शाखाप्रमुख, संबंधित प्रशासकीय विभाग यांना देऊन प्राप्त आदेशानुसार विनंती करण्यात येते की, ज्या प्रशासकीय विभागामध्ये महाविद्यालयांशी व परिसंस्थांशी संबंधित कामे चालतात, अशा सर्व विभागांनी **सन २०२०—२१ ची अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (All India Survey Higher Education) ची माहिती आणि माहिती व्यवस्थापन प्रणाली (एम आय एस २०२१—२२) संबंधित वेबपोर्टलवर भरल्यानंतर अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडून निर्गमित करण्यात येणारे ना—हरकत प्रमाणपत्र पाहूनच महाविद्यालयांची व परिसंस्थांची कामे करावीत, ही विनंती.**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.

२. मा. वित्त व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.

३. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

४. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

५. मा.उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

६. सहाय्यक कुलसचिव, आरक्षण विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.